०५

# निर्देश पत्र
## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( नगरसचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| | |
|---|---|
| विषय | विशेष सा. सभेचे इतिवृत्त |
| | सभा दि. ८.१२.२००१ |

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | प्रकरण पृ.: ८८ |

(१२)

१४/१५

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०६/०९/२०१४.

## <u>विशेष मा. स्थायी समिती सभा</u>

**सभा सूचना क्र. :- १२ दिनांक ०६/०९/२०१४**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती. ______________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची विशेष मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०९/०९/२०१४ रोजी सकाळी १०.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १२, दि. ०६/०९/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

विशेष मा. स्थायी समिती सभा सुचना क्रमांक १२, दि. ०६/०९/२०१४ सोबतची विषय पत्रिका
सभा मंगळवार दि. ०९/०९/२०१४

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| --- | मागील सभांचे इतिवृत्तांत – निरंक |
| --- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| --- | विनंती अर्ज - निरंक |
| --- | परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - निरंक |
| --- | आयुक्तांकडील पत्रे व कामकाज - |
| ८६ | विकास कामांना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) |
| -- | शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे |
| --- | समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल - निरंक |

दिनांक :- ०६/०९/२०१४.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. स्थायी समिती सभा दि. ०९/०९/२०१४

## गोषवारा

**प्रकरण क्र.(** ८६ **)** :- कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. ४७ मधील रा.म. क्र. ०८ जवळील घोडबंदर गांव येथील अमृतेश्वर महादेव मंदीरा जवळील संरक्षण भिंत दि.०६/०९/२०१४ रोजी सुमारे पहाटे २.३० वाजता अचानक कोसळली: सदर ठिकाणी कोणतीही जिवित व वित्तहानी झाली नाही. सदर संरक्षण भिंत लगतचा ३.०० मी रस्ता खचल्यामुळे घोडबंदर गांव ते वर्सोवा नाका पर्यंत वाहतुक बंद झाले आहे. घोडबंदर गांव ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ (सगनादेवी मार्ग) हा रस्ता पर्यायी खुला आहे.

घोडबंदर गांव अमृतेश्वर महादेव मंदीर ते कल्याण गुप्ता यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. संरक्षण भिंत (Retaining wall) बांधण्याची व रस्ता दुरूस्तीची अत्यंत गरज आहे. सदर कामाचे डीझाईन मे. एच.एम.राजे कंन्सल्टंट प्रा. लि. यांच्या मार्फत तातडीने करून घेण्यात आले आहे. त्याअनुशंगाने खालीलप्रमाणे अंदाजपत्रके बनविण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | घोडबंदर गांव अमृतेश्वर महादेव मंदीर ते कल्याण गुप्ता यांच्या घरापर्यंत आर.सी.सी. संरक्षण भिंत (Retaining wall) बांधणे | रु.३३,९२,९००/- |
| २ | घोडबंदर गांव रेती बंदर अमृतेश्वर महादेव मंदीर ते रिलायन्स ट्रान्सफॉर्मर पर्यंत रस्ता पुर्नःपृष्ठीकरण करणे | रु.१३,६८,५००/- |

घोडबंदर गांव अमृतेश्वर महादेव मंदीर परिसरात दाट लोकवस्ती असल्यामुळे व पुढील अपघात टाळण्यासाठी कामपुर्ण करून घेण्यासाठी सदर जागेत बॅरेकेटींग करावी लागणार आहे. घोडबंदर गांव अमृतेश्वर महादेव मंदीरा लगतच रेती बंदर येथे रेती व्यवसाय मोठया प्रमाणात चालतो व सदर रस्त्यावरून रेती वाहतूक मोठयाप्रमाणात होते. त्यामुळे सदर काम हे मुख्य रस्त्यावर असल्याकारणाने तातडीने करून घेणे आवश्यक आहे.

अ.क्र. ०१ च्या कामासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी नाला क्रॉसिंग करीता कल्वर्ट बांधणेच्या कंत्राटदाराकडून मंजूर दराने करून घेता येईल. तसेच रस्त्याचे काम देखील मंजूर दराने कंत्राटदाराकडून करून घेता येईल.

सदर प्रस्तावित कामे मंजूर दराने संबंधित कंत्राटदाराकडून करून घ्यावी लागेल. तरी सदर कामांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

**कार्यकारी अभियंता (सा.बां.)**
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC2/2014-15/PW/SG-1